

# भूगोल-अर्थशास्त्र, लेख-१६

**सदाशिव पाटील, शाळा :** बालमोहन विद्यामंदिर, दादर

## सराव प्रश्नपत्रिका

**वेळ २ तास** **गुण (४०)**

सूचना : सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक.
उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.
भारताचा नकाशा आराखडा वापरा.
नकाशा काढण्यासाठी स्टेन्सिलचा वापर करण्यास परवानगी आहे.
आलेख कागदाचा वापर करावा.

**प्र. १ - (अ) कंसात दिलेल्या पर्यायांपैकी योग्य तो पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.** **(३)**

१) भारतातील एकूण भौगोलिक क्षेत्राच्या सुमारे १३ टक्के क्षेत्र ...... आहे.
(पडीत क्षेत्राखाली, वनांखाली, बिगर लागवडीखाली, लागवडीखाली)

२) रेल्वे इंजिन निर्मिती कारखाना ...... येथे आहे.
(कोलकाता, चित्तरंजन, पेरांबूर, बंगळूर)

३) सौराष्ट्रातील ...... गायी दूध उत्पादनासाठी प्रसिद्ध आहेत.
(साहिवाल, देवनी, गीर, कपिला)

**(ब) योग्य जोड्या जुळवा.** **(३)**

| स्तंभ 'क' | स्तंभ 'ख' |
|---|---|
| (१) सुंद्री | (१)सुगंधी द्रव्ये |
| (२) शिसव | (२)होड्या |
| (३) चंदन | (३)वेष्टणपेट्या |
| | (४)फर्निचर |

**प्र. २ - (अ) भौगोलिक कारणे लिहा. (कोणतेही दोन)** **(४)**

१) पंजाब व हरयाणा राज्यांत कालव्यांद्वारे जलसिंचन जास्त आहे.
२) ऊर्जा संसाधनांचे संधारण महत्त्वाचे आहे.
३) भारतात लोकसंख्यावाढीचा वेग जास्त आहे.

**(ब) टीपा लिहा. (कोणत्याही दोन)** **(४)**

१) औद्योगिक प्रदूषण
२) पडीत क्षेत्र
३) संसाधन संधारण

**प्र. ३ - (अ) दिलेल्या सांख्यिकीय माहितीच्या आधारे आलेख कागदावर रेषालेख काढा.** **(२)**

| वर्ष | भारतातील मत्स्य उत्पादन (लक्ष टन) |
|---|---|
| १९७०-७१ | २६ लक्ष टन |
| १९८०-८१ | ४४ लक्ष टन |
| १९९०-९१ | ५५ लक्ष टन |
| २०००-०१ | ६३ लक्ष टन |

**(ब) दिलेल्या आकृतीचे वाचन करून त्यासंबंधी प्रश्नांची उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** **(२)**

१)भारतात दक्षिणेकडे कोणत्या राज्यात रस्त्यांची घनता जास्त आहे?
२) राजस्थानमध्ये रस्त्यांची घनता किती आहे?
३) रस्त्यांची घनता कमी असणाऱ्या इशान्येकडील एका राज्याचे नाव लिहा.
४) पश्चिम बंगालमध्ये रस्त्यांची घनता किती आहे?




**(क) भारताच्या नकाशा आराखड्यात पुढील घटक दाखवा, नावे द्या, चिन्हांची सूची आवश्यक (कोणतेही दोन)** **(२)**

१) भारतातील सर्वाधिक ज्वारी उत्पादक राज्य
२) हिराकूड प्रकल्प
३) दिग्बोई (तेलशुद्धिकरण केंद्र)
४) दिल्ली-चेन्नई वायुमार्ग

**प्र. ४ - पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)(८)**

१) भारतातील जलसिंचनाच्या भूजल स्रोताविषयी माहिती द्या.
२) भारतीय शेतीची वैशिष्ट्ये कोणती?
३) दगडी कोळसा खनिजाची उपयुक्तता सांगून भारतातील द. कोळसा उत्पादन क्षेत्रांची माहिती द्या.

### अर्थशास्त्र

**प्र. ५ - दिलेल्या पर्यायांमधून योग्य तो पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.** **(२)**

१) व्यापार उदारीकरण म्हणजे आयातींच्या मार्गातील अडथळे आणि निर्यात ... कमी करणे होय.
(कर, अर्थसहाय्य, जकाती)

२) आर्थिक वृद्धीने .... बदल अपेक्षित असतात.
(गुणात्मक, संख्यात्मक, तुलनात्मक)

**प्र. ६ - एक ते दोन वाक्यांत उत्तरे लिहा. (कोणतेही तीन)** **(६)**

१) 'खुला व्यापार' या संकल्पनेचा तुम्हाला उमगलेला अर्थ काय?
२) उद्योगांमध्ये घटत्या उत्पत्तीचा नियम का कार्यान्वित होतो?
३) संकुचित व विस्तृत अर्थाने खासगीकरण म्हणजे काय?
४) भाववाढीच्या काळात कोणत्या वर्गांना फायदा होतो?
५) सार्वजनिक वितरण प्रणालीमधून धान्याची खरेदी कोण करीत नाही?

**प्र. ७ - पुढील प्रश्नांची प्रत्येकी पाच ते सहा वाक्यांत उत्तरे लिहा. (कोणतेही एक)** **(४)**

१) उपभोक्त्यांची कर्तव्ये कोणती आहेत?
२) मागणीतील वाढीस जबाबदार असणारे कोणतेही चार घटक स्पष्ट करा.

**उद्याचा विषय : सराव प्रश्नपत्रिका (बीजगणित)**

**संपर्क :** yashasvibhava2007@gmail.com

लोकसत्ता
यशस्वी भव!
दहावी अभ्यास मालिका